# ( जाहिरात क्रमांक -1 )

# राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, ( चंबुखडी), शिंगणापूर, ता- करवीर, जिल्हा - कोल्हापूर. कडे कंत्राटी तात्पुरत्या स्वरुपाची निवासी पुरुष रेक्टर (पदसंख्या 1) भरती जाहिरात

जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, (चंबुखडी), शिंगणापूर, ता- करवीर जिल्हा कोल्हापूर येथे निवासी पुरुष रेक्टर (पद 1) नियुक्ती करण्यात येणार आहे. सदरची नियुक्ती हि पुर्णत: कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती असणार आहे. त्यासाठी मासिक एकत्रित मानधन रु. 12,000/- इतके असून खालील पद भरणेत येणार आहे.

जाहिरात दिलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पुर्ण करीत असलेल्या अनुभवी उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात अर्ज करावेत. सदरचा अर्ज दिलेल्या विहीत नमुन्यात टंकलिखीत करुन दि. 04/02/2020 ते दि.18/02/2020 अखेर सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 पर्यंत या वेळेत सुटटीच्या दिवशीही समक्ष अथवा पोष्टाने प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे स्विकारले जातील. दि.19/02/2020 या तारखेनंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरची जाहिरात जिल्हा परिषद, कोल्हापूर च्या www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळार उपलब्ध आहे.

| अ क्र | तपशील | पद | शैक्षणीक अर्हता | वयोमर्यादा | अनुभव | मासीक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुरुष वसतिगृह प्रमुख (रेक्टर) | 1 | 1.एम.एस. डब्ल्यु आवश्यक 2.माजी सैनिक / बी.पी.एड असल्यास प्राधान्य | 45 | किमान 1 वर्षाचा | 12000/- |
| एकूण | | 1 | | | | 12000/- |

वरील कंत्राटी पद भरती बाबतची अटी व शर्ती थोडक्यात माहिती खालील प्रमाणे आहे.

1. कंत्राटी पुरुष वसतीगृह प्रमुख (रेक्टर) उमेदवाराची शैक्षणीक अर्हता पुढील प्रमाणे
   1. उमेदवार हा एम.एस.डब्ल्यु आवश्यक
   2. एम.एस.डब्ल्यु उपलब्ध न झाल्यास माजी सैनिक / बी.पी.एड असल्यास प्राधान्य
   3. 31 डिसेंबर 2019 रोजी वय कमाल 45 वर्षांचे आत असणे आवश्यक

**पुरुष रेक्टर पदाची घटना व नियमावलीप्रमाणे अटी व नियमावली थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.**

1) सर्व विद्यार्थी पहाटे वेळेवर उठविण्याचा बंदोबस्त करणे.
2) सर्व विद्यार्थी खेळाच्या गणवेषात तयार झाले की नाही ते पहाणे व क्रिडा प्रशिक्षकांकडे पाठविणे.
3) विद्यार्थी दररोज शाळेत वेळेवर जातात की नाही ते पहाणे व त्यास काही अडचणी आल्यास त्याचे निवारण करणे.
4) शाळेच्या प्राचार्यांना/ मुख्याध्यापकांना गरजेनुसार व किमान महिन्यातून एकदा भेटून विद्यार्थ्यांच्या वर्तनाविषयी व शालेय प्रगतीविषयी चौकशी करणे.
5) नेमूण दिलेल्या वेळेत विद्यार्थी अभ्यास करतात की नाही याकडे लक्ष देणे.
6) विद्यार्थ्यांना प्रशालेतून देणेत आलेल्या शालेय सामाना व्यतिरिक्त जर त्यांची काही गरज असेल तर त्याविषयी

मुख्याध्यापकांना माहिती देवून त्यांना उपलब्ध करुन देणे.

7) आजारी प्रशिक्षणार्थीची देखभाल व जरुरी प्रमाणे आरोग्य सेविका यांच्या समवेत दवाखान्यात दाखल करणे इ.

8) पालक भेटीचे वेळी एकमेकाचे अडचणी निवारणास सहाय करणे.

9) कार्यालयाने ठरवून दिलेला वेळ 24 तास उपस्थित राहणे बंधन कारक राहील.

10) सदर उमेदवारास निवासी व्यवस्था ,नाष्टा,जेवण इ. दिले जाईल

11) पुरुष रेक्टर मानधन जि.प.च्या ठेवीवरील प्राप्त होणारे व्याजामधून खर्च टाकणेत येईल, आणि एकत्रित मासिक मानधन रक्कम रु. 12,000/- इतके असेल.

12) सदरची नियुक्ती हि पुर्णत: तात्पुरती आणि कंत्राटी असणार आहे. त्यामुळे कोणत्याही उमेदवाराला सेवेत कायम करण्याचा व नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय राहणार नाही याची उमेदवारानी नोंद घ्यावी. तसेच निवड झालेल्या उमेदवारांकडून रु. 500/- स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेणेत येणार आहे.

13) जाहिरातीमधील नमुन्यामध्येच अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यासोबत आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रत जोडणेचे आहेत. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन पात्र असणारे उमेदवारांना मुलाखतीसाठी लेखी कळविणेत येईल. मुलाखतीसाठी कोणत्याही प्रकारचा भत्ता किंवा प्रवास खर्च कार्यालयाकडून दिला जाणार नाही तो उमेदवाराने स्वत: करणेचा आहे. उमेदवारांची निवड ही मुलाखतीद्वारे गुणवत्तेनुसार सदरच्या प्रशालेचे कार्यकारी नियामक मंडळ करील.

14) सदरची भरतीबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये जिल्हास्तरावरुन जाहिरात देऊन करणेत येईल.

15) क्रीडा प्रशालेच्या घटना व नियमावलीनुसार आणि कार्यकारी नियामक मंडळ सभा दि. 07.12.2019 विषय क्र. 7 ठराव क्र. 33अन्वये 11 महिने अर्थात शैक्षणिक वर्षासाठी कंत्राटी पुरुष रेक्टर नियुक्त करणेबाबतचा ठराव केला असून त्यानुसार कार्यवाही होणेस हरकत नाही असे वाटते.

16) कंत्राटी पुरुष रेक्टर ही पुर्ण: कंत्राटी आणि तात्पूरती असल्यामूळे जि.प.सेवेत कायमस्वरुपी नियुक्तीसाठी अर्ज किंवा दावा सांगता येणार नाही. कायमस्वरुपी नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

17) उमेदवारांनी वरील अट क्र. 1 नुसारच पात्र असणारे अर्ज करावेत अर्धवट किंवा अपुरी कागदपत्रांची अर्ज ग्राहय मानले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

18) नियुक्ती केलेल्या उमेदवाराचे काम पाहून दर 11 महिन्यातून एक दिवस खंड देऊन पुनश्च नेमणूक आदेश देणेत येईल.

1) **अर्ज करावयाची पध्दत :-**

   1) अर्ज A-4 साईज पेपरवर दिलेल्या नमुन्यातच टंकलिखित केलेला असावा.
   2) अर्जावरिल फोटो अलीकडील व साक्षांकित केलेला असावा.
   3) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वयाचा पुरावा, अनुभवाचा दाखला, डोमेसाईल प्रमाणपत्र, माजी सैनिकांचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र, स्वातंत्रसैनिक पाल्य प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र अनुभव दाखला इत्यादीच्या प्रति साक्षांकित केलेल्या प्रती जोडाव्यात. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करताना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
   4) अर्जाच्या लिफाफयावर ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाचा, उल्लेख करण्यात यावा.

**विशेष सुचना :-**

1. **वयोमर्यादा** – उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. 31 जानेवारी 2020 रोजी वय कमाल 45 वर्षाचे आत असणे आवश्यक

2. **सेवा शुल्क्** – खुल्या प्रवर्गातील उमदवारासाठी 500/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी 250/- चे सेवा शुल्क भारतीय स्टेट बँक, कोल्हापूर येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफट (डी.डी.)मा. मुख्य लेखा व वित्त् अधिकारी जि.प. कोल्हापूर याचे नावे काढून अर्जासोबत जोडावा.
3. सदरची नियुक्ती हि 11 महिन्यासाठी मर्यादित आहे याची नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
4. निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास / शिफारसपत्र आणल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.
5. प्राप्त अर्जामधून तयार करण्यात आलेली प्रतिक्षा यादी एक वर्षासाठी मर्यादित राहील.

6. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. 18/02/2020 रोजी सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत असेल. मुदतीनंतर समक्ष अथवा पोष्टाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

1) विहीत नमुन्यात नसलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.
2) अर्जात पत्रव्यवहाराचा पत्ता जवळच्या खुणेसह ( Land Mark ) नमूद करावा. संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवावा. तसेच स्वत:चा ई मेल आयडी नमूद करावा.
3) अपुर्ण व चुकीची माहिती भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
4) अर्जासोबत जोडावयाच्या शैक्षणिक त्याचप्रमाणे व्यावसायिक पात्रतेचे व इतर दाखल यांच्या प्रती सांक्षाकित करुनच अर्जासोबत जोडण्यात याव्यात. त्यानंतर सादर करता येणार नाही.
5) अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
6) आरक्षणाचा लाभाकरीता त्या त्या प्रवर्गात मोडत असलेल्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करावे.
7) सदरची जाहिरात जिल्हा परिषदेच्या www.zpkolhapur.gov.in या संकेमस्थाळावर उपलब्ध आहे.
8) उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**रेक्टर पदाकरीता सुचना :-**

1) (अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10,दि.27जून2011 नुसार ज्या उमेदवाराकडे डोमीसाईल प्रमाणपत्र उपलब्ध नसलेस त्याने त्यांचा जन्म महाराष्ट्रात झाला असल्यास दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डोमीसाईल प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(ब) सदर उमेदवाराकडे जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक आहे.

(क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्रात राज्यात जन्म झालेल्या उमेदवाराला लागू राहील.

2) सेवा योजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हा अधिकारी यांचेकडून प्राप्त होणा-या जनगणना, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड, यांचेकडून शिफारस होणा-या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहीरातीप्रमाणे अर्ज करणे बंधनकारक आहे.
3) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारानी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी / जिल्हा पुनवर्सन अधिकारी यांचेकडील प्रकल्पगस्त व भुकपंग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणेच्या आहेत. अन्यथा अर्ज अपात्र समजण्यात येईल. तसेच प्रमाणपत्र पडताळणीनंतर नियुक्ती ओदश देणेत येतील.
4) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 1 जुलै 2005 नुसार लहान कुटुंब असलेचे प्रमाणपत्र खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अर्जासोबत स्वतंत्ररित्या आवश्यकत्या कागदपत्रासह सादर करणे आवश्यक राहील.

5) लिपीकाचे मानधन हे निवासी प्रशालेची कार्यकारी नियामक समिती जे ठरवतील ते अदा करणेत येईल याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.
6) सदरची नियुक्ती पुर्णत: तात्पुरती असून ती कत्राटी आहे, तयामुळे शासकीय सेवेत कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार मागता येणार नाही, तसेच सदरची नियुक्ती हि काम समाधानकारक नसलेस कोणतेही कारण किंवा लेखी न कळविता नियुक्ती रद्द करणेत येईल, याबाबत कोठेही तक्रार करता येणार आहे, आणि कोणतेही राजकिय दबाव आणता येणार नाही.
7) नियुक्तीचे सर्व अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर ने आपल्याकडे राखून ठेवला आहे. तसेच अंतिम निर्णयदेखील जिल्हा परिषद, कोल्हापूरने राखून ठेवला आहे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद,कोल्हापूर. | जिल्हा परिषद कोल्हापूर. | जिल्हा परिषद,कोल्हापूर. |

**नमुना खाली दिला आहे.**

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना -अ

मी श्रीमती / कुमारी --------------------------------------------- श्री ----------------------------- ----------------- यांची पत्नी / मुलगा / मुलगी वय ------वर्ष राहणार -------------------------------------- ----------- याद्वावरे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते कि,

1) मी -------------------------------------- या पदासाठी माझ अर्ज दाखल केला आहे.
2) आज रोजी मला ----------- ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापेकी दि. 28 मार्च 2005 तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे ( असल्यास जन्म दिनाक नमुद करावा)
3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. 28 मार्च 2005 तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराची सही

उमेदवाराचे संपुर्ण नांव :---------------------------------

1) अंतिम निवड यादीतील उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी केलेशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
2) एखादा उमेदवार त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून वगळणेत येईल.
3) मुलाखतीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी ही जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळा www.zpkolhapur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.
4) जाहीरातीधील काही बाबी विषयी शंका असल्यास याबाबत सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना कार्यालयीन दिवशी व वेळेत समक्ष भेटावे.

# शिक्षण विभाग (प्राथमिक) - जिल्हा परिषद,कोल्हापूर

**अर्जाचा नमूना**

**कंत्राटी पुरुष रेक्टर या पदासाठीचा अर्ज**-2020

.

उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा.

**प्रति,**

सदस्य सचिव, कार्यकारी नियामक समिती, कोल्हापूर.
तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

**भरती पदाचे नांव :- कंत्राटी पुरुष रेक्टर या पदासाठीचा अर्ज**-2020

1) उमेदवाराचे संपुर्ण नांव :- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव

---------------- ----------------- -----------------

2) उमेदवाराचे नावात बदल असलेस :- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव

--------------- ------------------ ---------------

3) पत्र व्यवहाराचा पत्ता :------------------------------------------------------------------

4) जात :- ------------------------ पोट जात :- ---------------------------

जातीचा प्रवर्ग (योग्य ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी) (सदर बाब अपंग कर्मचा-यासाठी लागू नाही)

| अनु. जाती. | अनु. जमाती | वि.जा. ( अ ) | भ.ज. (ब ) | भ.ज. (क ) | भ.ज. (ड ) | वि. मा. प्र. | इ. मा. व. | शै. व सा.मा. प्र. | विमा. प्र.(अ) | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

5) आवश्यकत्या ठिकाणी ( ✓) अशी खुण करावी.

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पगस्त | भुकंपग्रस्त | अपंग | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

6) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये) (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

7) उमेदवाराचे अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांकास दि. . .2020_ इ. रोजी असलेले वय.

| वय वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

8) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय?(डोमीसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे).- होय / नाही

9) अर्जदार ( विवाहीत ) / ( अविवाहीत )

10) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता ( उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशिल )

| शेक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तिर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

11) नाव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव :- -------- नोंदणी क्रमांक -------- व दिनांक :---

वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते कि अर्जात नमद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी मागविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहीन.

ठिकाण :-

अर्जदाराचे संपुर्ण नांव :-

दिनांक :- / /2020

----------x---------------x------------------x---------------x------------------x---------------x--------------

टिप :- जाहिरातीमध्ये पदासाठी विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता व अटीनुसार आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या सत्यप्रती, जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाणे बंधनकारक राहील अन्यथा अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

सही/-
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

सही/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
जिल्हा परिषद कोल्हापूर.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

<table>
<tr><td>[]<br>राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला,<br>(चंबुखडी) शिंगणापूर, ता- करवीर, जिल्हा- कोल्हापूर.</td><td>प्रवेशपत्र - 2019.<br>अहस्तांतरणीय</td></tr>
<tr><td>उमेदवाराचे संपुर्ण नांव :- ---------------------------------------------------<br><br>पदाचे नांव :- ------------------------------------------------------------<br>उमेदवाराची स्वाक्षरी</td><td rowspan="2">उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा.<br>उमेदवारानोअलिकडील-काळातील पासपोर्ट साईज फोटोालावावा)व तो राजपत्रित अधिकारी.</td></tr>
<tr><td></td></tr>
</table>

सही/- सही/- सही/-

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
जिल्हा परिषद कोल्हापूर.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,कोल्हापूर.